दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

u RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com lakshamaha.dhule@gmail.com lakshamaha.nsk@gmail.com

धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती | वर्ष ४ थे | अंक : २५६ वा | बुधवार दि. १२ जुलै २०२३ | किंमत : २ रु. | पृष्ठे : ६

## अजित पवारांसोबत गेलेले आमदार स्वगृही परत येणार : पवार

**मुंबई ।** राष्ट्रवादी काँग्रेससोबत बंडखोरी करणारे जवळपास ९५ टक्के आमदार स्वगृही परत येतील, असा दावा राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. अजित पवारांसोबत नेमके



किती आमदार गेले याची चर्चा सातत्याने होते. आमदार रोहित पवार यांनी शरद पवारांसोबतच राहण्यास प्राधान्य दिले आहे. ते विचारधारेच्या मुद्यावरून सातत्याने बंडखोर आमदारांवर हल्ला चढवत आहेत. आता त्यांनी बंडखोर आमदारांपैकी ९० ते ९५ टक्के आमदार परत येतील, असा दावा केला आहे.

### न्यूज कॉलम

#### तरुणावर टोळक्याचा प्राणघातक हल्ला

**धुळे ।** पोलिसात तक्रार का दिली असा जाब विचारुन एका तरुणावर प्राणघातक हल्ला करणार्या टोळक्याविरोधात गुन्हा दाखल झालेला आहे. चाळीसगावरोडवरील जामचा मळा परिसरात राहणारा शाहरुख अब्बास खाटीक या तरुणावर त्याच भागात राहणार्या सलीम रईस शाह उर्फ उस्ताद, अमीर शेख उर्फ भाया, अयांश सलीम शाह यांचेसह चार ते पाच लोकांनी काल रात्री त्याच्या घरी जावून त्याच्या डोक्यावर तलवारीने हल्ला चढविला तसेच इतर आरोपींनी शिवीगाळ करीत मारहाण केली आणि जीवे ठार मारण्याची धमकी देत तीस हजार रुपयांची रोकड बळजबरीने हिसकावून घेतली.

#### मुंबईत आज काँग्रेसचे सत्याग्रह आंदोलन

**मुंबई ।** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधात भाजपने सुडबुद्धीने कारवाई केली. खासदारकी रद्द करुन राहुल गांधी यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला आहे. खोट्या तक्रारीच्या आधारे त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. राहुल गांधी यांच्या पाठीशी काँग्रेस पक्ष खंबीरपणे उभा आहे हा संदेश देण्यासाठी आज मुंबईत मंत्रालयाजवळच्या महात्मा गांधी पुतळ्यासमोर मौन सत्याग्रह आंदोलन केले जाणार आहे.

# अफजलखानाच्या वेळेला धर्मांतरे व्हायची.. भाजपच्या काळात पक्षांतरे होतायेत..!

### उद्धव ठाकरेंचा घणाघाती हल्ला

**मुंबई । प्रतिनिधी**

मी कलंक हा शब्द वापरला तर तो शब्द तुम्हाला एवढा लागला. पण तुन्ही एखाद्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करुन त्याचं घरदार उद्ध्वस्त करता, कुटुंबाला त्रास देता, त्यांची बदनामी करता, हा कलंकीत करण्याचा प्रकार नव्हे काय? आरोप करुन त्यांना वाटेल तेवढा मानसिक त्रास द्यायचा, नोटीसा पाठवायच्या आणि पक्षात येण्यासाठी मजबूर करायचं, ही तुमची निती कलंकित नाहीतर काय आहे? असे सवाल करताना अफजलखानाच्या वेळेला धर्मांतरे व्हायची, भाजपच्या काळात पक्षांतरे होतायेत, असा घणाघाती हल्ला शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केला.

उद्धव ठाकरे यांची राज्याची उपराजधानी नागपुरात काल सभा संपन्न झाली. या सभेत त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर शरसंधान साधताना शब्द फिरवणारे देवेंद्रजी नागपूरला लागलेले कलंक आहेत, असा शब्दप्रयोग केला. उद्धव ठाकरे यांच्या टीकेनंतर भाजप कार्यकर्त्यांनी नागपुरात धुडगूस घातला. तर भाजप नेत्यांनीही उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार पलटवार केले. या सगळ्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी मातोश्री निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधून विविध प्रश्नांना उत्तरे दिली. कलंक हा शब्द त्यांना एवढा झोंबला असेल तर त्यांच्याकडून ज्या प्रकाराचा कारभार सुरू आहे, तो महाराष्ट्राला कलंकच आहे. तो कलंक लावणं त्यांनी थांबवावं. कुणालाही भ्रष्ट म्हणणं हा त्या कुटुंबाला लावलेला कलंकच आहे. अनेक कुटुंबांना कलंकित करुन त्यांची समाजात किंमत कमी करून मग तुम्ही त्यांना मंत्री करताय याला काय अर्थ आहे. कुणाच्या दारात जाण्यापेक्षा घरात जा-पण सुख आणि आनंद घेऊन जा. तळतळाट घेऊन बाहेर पडू नका. जसं अफजलखानाच्या वेळेला धर्मांतर करण्यासाठी घरंदारं लुटली जात होती. उद्ध्वस्त केली जात होती. तसं आता पक्षांतर करा नाहीतर कुटुंबासकट मारले जाल, जेलमध्ये टाकू.. ही अफजलखानाची वृत्ती देशाला आणि राज्याला लावू नका, ही विनंती

सरकार दारोदारी जात आहे पण लोकांची कामं होत नाही. सरकार दारी जाऊन काही उपयोग नाही. त्यापेक्षा लोकांच्या घरात काय आहे हे सरकारने पाहिलं पाहिजे. योजनांचा पाठपुरावा करण्याचा कार्यक्रमच मी लोकांना दिलाय. होऊन जाऊ दे चर्चा असं त्याचं नाव आहे, असंही उद्धव ठाकरेंनी म्हटलं. फोडाफोडीच्या राजकारणाला लोक कंटाळले आहेत. त्या विरोधात लोकांच्या मनात चिड आहे. मला त्यांनी सांगितलं की आम्हाला हे मुळीच पटलेलं नाही. लोक मतदानाची वाट बघत आहेत. ते आपला राग मतपेटीतून



#### पंतप्रधान नरेंद्र मोदींवरही निशाणा

**पंतप्रधान मोदी आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार १ ऑगस्ट रोजी पुण्यात पुरस्कार वितरण सोहळ्यानिमित्त एकाच व्यासपीठावर येणार आहेत. आता शरद पवार यांच्यासोबत मंचावर बसणार आहात मग ७०,००० कोटींच्या घोटाळ्याचं काय झालं? असा टोलाही त्यांनी लगावला.**

#### चक्की पिसिंगचे काय? -

**भ्रष्टाचाराचे आरोप करून तुम्ही एखाद्यावर कलंक लावता त्याचे काय होते? असा सवाल त्यांनी भाजप आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारला आहे. चक्की पिसिंग म्हणून अजित पवार यांच्यावर आरोप केले होते. त्या वेळी केलेल्या त्या आरोपांचे काय झाले? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या माध्यमातून उद्धव ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षावर जोरदार टीका केली.**

#### नागपुरात काय म्हणाले होते उद्धव ठाकरे?

**उद्धव ठाकरे यांनी सोमवारी नागपुरातील कायकर्ता मेळाव्यात देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. त्यात त्यांनी त्यांचा उल्लेख नागपूरचा कलंक म्हणून केला होता. तेव्हापासून भाजपने ठाकरेंवर टीकेची झोड उठवली आहे. देवेंद्र फडणवीस नागपूरला लागलेला कलंक आहेत. ते आता उद्धव ठाकरेंनी पाठीत खंजीर खुपसल्याचा दावा करत आहेत. उद्धव ठाकरेच्या पाठीत खंजीर कुणी खुपसला? २०१४ ते २०१९ तुमच्याबरोबर सत्तेत होतो. २०१४ साली शिवसेनेने नाही, तर तुम्ही युती तोडली. तेव्हा मी काँग्रेसबरोबर गेलो नव्हतो. मी तिथेच होतो. तिथेच आहे. वार करणारी तुमची अवलाद आहे माझी नाही, असे ठाकरे म्हणाले होते.**

#### लोकांनी बघायचं काय?

**राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर मोदी आणि शरद पवार एकत्र येणार आहेत काहीच दिवसांपूर्वी महाराष्ट्रात विकासाचा मुद्दा घेत भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष एकत्र आले आहेत. त्यावरुन राज्यात आरोप प्रत्यारोप सुरु आहेत. यावर बोलताना ते म्हणाले की, ज्या पक्षावर ७० हजार कोटींच्या घोटाळ्याचा आरोप केला तोच पक्ष आता तुमच्यासोबत आला आहे. आमच्यातील काही मिंधे तुमच्यासोबत आहे. त्यात शरद पवारही असतील. मग शेवटी लोकांनी बघायचं काय? जे आरोप केले असतील त्याला जागा. आरोप करताना जबाबदारीनं वागा, असंही उद्धव ठाकरेंनी खडसावलं आहे.**

# 'शासन आपल्या दारी'ची गंमतच भारी : शामकांत सनेर

**धुळे । प्रतिनिधी**

'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाचा जनतेला खरंच फायदा होत आहे का? असा प्रश्न माजी विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी गेल्या महिन्यात जळगाव दौऱ्यावर विचारला होता. अमळनेर येथून पत्रकारांशी संवाद साधताना अजित पवार म्हणाले होते की, सरकारने राज्यातील बेरोजगारी, महागाई आणि शेतकऱ्यांच्या पिकाला न मिळणारे दर याकडे लक्ष दिले पाहिजे. सध्या 'शासन आपल्या दारी' अशा प्रकारचे कार्यक्रम राबविले जात आहेत, त्या कार्यक्रमांच्या निमित्ताने प्रचंड मोठ्या प्रमाणात खर्च केला जातोय. वास्तविक सरकारमधल्या प्रमुखांना कशा प्रकारे कार्यक्रम घ्यायचे, काय करायचे हा पूर्ण अधिकार आहे. पण त्या कार्यक्रमाचा खरंच सर्वसामान्य जनतेला फायदा होतो की नाही एवढे बघायची जबाबदारी सरकारची आहे. कारण जनतेचा पैसा आहे.

'शासन आपल्या दारी' च्या माध्यमातून शेकडो कोटी रुपये खर्च करुन खोट्या जाहिराती दाखवल्या जात आहेत, असे म्हणत अजित पवारांनी या कार्यक्रमावरून प्रश्न उपस्थित केले होते.आज त्याच अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री म्हणून धुळे जिल्ह्यातील 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमात बोलतांना या कार्यक्रमाचे तोंड भरुन कौतुक केले. शासनाचे हे क्रांतिकारी पाऊल असून खऱ्या अर्थाने शासकीय योजना गरजू लोकांपर्यंत पोहचत असल्याचा त्यांना साक्षात्कार झाला. असे पत्रक धुळे जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शामकांत सनेर यांनी काढले आहे.

शासन आपल्या दारी हा पूर्णपणे शासकीय निधी खर्च करून संपन्न होणारा राजकीय कार्यक्रम असून गेल्या दीड दोन वर्षांपासून विविध योजनांचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यांना एकत्र करण्याचे काम या राज्यभरातील कार्यक्रमात केले जात आहे. दीड वर्षांपूर्वी शेळी मेंढी पालन योजनेच्या लाभार्थ्याला, घरकुल योजनेतील, रोजगार हमी योजनेच्या लाभार्थ्यांना बोलविण्याचे उद्योग जिल्हा प्रशासनाने केले आहेत. प्रत्येक गावातील तलाठीला संजय गांधी योजनेचा लाभ मिळत असलेल्या लाभार्थ्यांना, ग्रामसेवक, रोजगारसेवक यांना घरकुल योजना, रोहयो योजनेच्या लाभार्थ्यांना, कृषि सहाय्यकांना कृषि विभागाच्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना, स्वस्त धान्य दुकानदारांना जुने कार्ड नवीन बनवून दिलेल्या लाभार्थ्यांना आणण्याची जिल्हा प्रशासनाने जबाबदारी दिली होती. आपल्या पक्ष नेतृत्वाला धोका देऊन बंडखोरी करणाऱ्यांनी आणि राज्यातील दोन पक्ष फोडणाऱ्यांनी कितीही उदार असल्याचा आणि जनतेसाठी काहीतरी करत असल्याचा आव आणला तरी राज्यातील जनता महाविकास आघाडीच्यामागे खंबीरपणे उभी राहील आणि २०२४ मध्ये महाविकास आघाडीचे बहुमताचे सरकार सत्तेवर येईल असा विश्वास काँग्रेस जिल्हाध्यक्ष सनेर यांनी आपल्यो व्यक्त केला आहे.

## प्रवेश मर्यादा वाढविण्याबाबत युवासेनेचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ कलगुरूंना निवेदन

**धुळे । प्रतिनिधी**



जिल्हा युवासेनेकडे अनेक दिवसांपासून बीएससी व बीसीए प्रवेशाबाबत विद्यार्थ्यांची अनेक तक्रार व विनंतीपत्रे येत आहेत. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सध्या असलेली मर्यादित प्रवेश संख्या लक्षात घेता अनेक विद्यार्थी प्रवेश घेण्यापासून वंचित राहत असून विद्यार्थ्यांना खासगी महाविद्यालयांचा पर्याय स्वीकारावा लागत आहे.

याबाबत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू माहेश्वरी यांना ३०% प्रवेश संख्या वाढवण्यासाठी युवासेना धुळे जिल्हा पदाधिकाऱ्यांनी भेट घेऊन निवेदन दिले व सविस्तर चर्चा केली. यावेळी सदर विषयावर सविस्तर विचार करून प्रवेशसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करू व विद्यापीठ स्तरावर शक्य तेवढी विद्यार्थ्यांच्या हिताची भूमिका घेतली जाईल असे आश्वासन कुलगुरू महोदयांनी दिले. निवेदन देतेवेळी युवासेना उत्तर महाराष्ट्र विभागीय सचिव मा. विराज कावडीया, युवासेना धुळे जिल्हाप्रमुख हरीष माळी, उपजिल्हाप्रमुख कुणाल कानकाटे, महानगरप्रमुख सिद्धार्थ करनकाळ, महानगरप्रमुख मनोज जाधव, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख सिद्धेश नाशिककर, युवासेना कॉलेज कक्ष जळगाव लोकसभा प्रमुख प्रितम शिंदे आदी युवासेना पदाधिकारी उपस्थित होते.

### मी माझे कर्तव्य पार पाडले, शेवटी पक्षाचा निर्णय : किरीट सोमय्या

**मुंबई ।** मी माझे कर्तव्य पार पाडले आहे. शेवटी पक्षाचा निर्णय असतो. पक्ष विशिष्ट पद्धतीने काम करत असतो. अनेक ठिकाणी न्यायालयीन कारवाई सुरू झाली आहे. न्यायालयात खटला सुरू असताना त्यावर बोलणे बरोबर नाही, असे मत भाजपचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी राष्ट्रवादीच्या सरकारमधील समावेशावर व्यक्त केले आहे. दरम्यान किरीट सोमय्या पुढे बोलताना म्हणाले की, उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदासाठी हिंदुत्वाला कलंक लावला आहे. उद्धव ठाकरेंनी अमरावती आणि नागपूरमध्ये झालेल्या सभेत किरीट सोमय्यांचा उल्लेख उपरा असा केला होता, त्यावर त्यांनी काहीही भाष्य केले नाही. मात्र, देवेंद्र फडणवीस यांच्यावर केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे.

## धुळे जि. प. च्या स्थायी समितीची सभा संपन्न



**धुळे । प्रतिनिधी**

धुळै जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीची सभा बुधवार दि. ११ जुलै रोजी कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात जि. प. अध्यक्षा अश्विनी पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सभेच्या शेवटी रोशन अहिरराव यांना दिव्यांग विवाह योजनेअंतर्गत पन्नास हजार रुपयांचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

सभेत विषय पत्रिकेवरील विषयांवर क्रमानुसार चर्चा करण्यात आली. त्यात सदस्यांचे रजेचे अर्ज असल्यास त्यांच्या रजा मंजुरीबाबत विचाविनिमय करणे, विषय समित्यांनी मागील सभेत केलेल्या ठरावांवरील कार्यवाहीचा आढावा घेणे, शासन निर्णय, परिपत्रकांचे वाचन करुन दाखविणे, लघुसिंचन विभागाकडील कामांच्या व्यपगत सुरक्षा अनामत रकमा परत करण्यास मान्यता देणे, आयत्या वेळेच्या विषयांवर ठराव करणे या विषयांचा समावेश होता.

सभेच्या शेवटी रोशन अहिरराव यांना दिव्यांग विवाह योजनेअंतर्गत पन्नास हजार रुपयांचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. या सभेला अध्यक्षा अश्विनी पवार, उपाध्यक्ष देद्र पाटील, सीईओ एस. भुवनेश्वरी, सभापती महावीरसिंग रावल, समिती सदस्य पोपटराव सोनवणे, किरण पाटील यांच्यासह सभासद, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## मुंबई शहर जिल्हास्तरीय ज्युनियर आणि कॅडेट किकबॉक्सिंग स्पर्धेचा समारोप

**मुंबई । प्रतिनिधी**

तिसरी मुंबई शहर जिल्हा ज्युनियर किकबॉक्सिंग स्पर्धा २०२३ चेंबूर येथील बीएमसी स्कूल, कलेक्टर कॉलनी येथे उत्साहात संपन्न झाली. स्पोर्ट्स किकबॉक्सिंग असोसिएशन मुंबई सिटी द्वारे आयोजित, या स्पर्धेत किकबॉक्सिंगच्या सहा वेगवेगळ्या प्रकारांमध्ये प्रतिभावान युवा खेळाडूंमध्ये तीव्र स्पर्धा पाहायला मिळाली.



संपूर्ण कार्यक्रमात त्यांचे कौशल्य आणि दृढनिश्चय प्रदर्शित करणाऱ्या अपवादात्मक सहभागींना एकूण ७६ सुवर्णपदके प्रदान करण्यात आली. स्पोर्ट्स किकबॉक्सिंग मुंबई शहर जिल्हा संस्थेचे अध्यक्ष उमेश मुरकर यांनी, श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे आगामी राज्य ज्युनियर किकबॉक्सिंग स्पर्धे साठी त्यांच्या पात्रतेवर भर देत विजेत्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. सुवर्णपदक मिळविणाऱ्या मुलींच्या यादीत मेधा थेवर, ईश्वरी बेलवेकर, कृतिका शुक्ला, दुर्वा कांबळे, आदिती जैस्वाल, निधी विश्वकर्मा, झाहरा फनुसवाला, सना शेख, सारा हकीम, कशिश जैस्वार, मानसी पटवा, हिंदवी बांदिवडेकर, सृष्टी धोत्रे, दुर्वा गावडे, झहरा कागलवाला, शिरीन मोल्ला, आराध्य परब, विरागी धर्मशी सुवर्णपदक पटकावणाऱ्या प्रतिभावान मुलांमध्ये ग्रिशम पटवर्धन, देवांश साखरकर, साक्षत् शेट्टी, आलोक ब्रिद, तृप्तेश धुरी, साईराज पासी, क्रुशांक गोसावी, यथार्थ बुडामाला, नयन गायकवाड, यज्ञेश खाडे, देवांश झा, ध्रुव पालव, पार्थ जोगळे, धनविथ शेट्टी, कृतव तेवर, अथर्व जाधव, शिधत गुप्ता, अथर्व जाधव, सॅम्युअल नागरे, चित्रेश शिवमठ, बुरहानुद्दीन रंगवाला, अलीअसगर सुतेरवाला, देवांश तोरस्कर, मयुरेश मुरकर, हसनैन या प्रतिभावान खेळाडूंनी दाखवलेली उल्लेखनीय कामगिरी केवळ त्यांची अपवादात्मक क्षमताच दाखवत नाही तर मुंबईतील किकबॉक्सिंगच्या आशादायक भविष्यावरही प्रकाश टाकते. हे युवा चॅम्पियन राज्य ज्युनियर किकबॉक्सिंग स्पर्धेत त्यांच्या जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची तयारी करत असताना, ते इच्छुक खेळाडूंना प्रेरणा देतात.

# शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत : ना. भुसे

### पालकमंत्र्यांच्या उपस्थितीत शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात बैठक

**नाशिक । प्रतिनिधी**



महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या समस्या सोडवण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे शासन आपल्या दारी अभियान संपूर्ण महाराष्ट्रात टप्पाटप्याने राबविले जात आहे. नाशिक जिल्ह्याचा शासन आपल्या दारी कार्यक्रम मुख्यमंत्री, शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत येत्या शनिवार दि. १५ जुलै रोजी नाशिक येथील गंगापूररोड वरील डोंगरे वसतिगृह मैदान येथे आयोजित करण्यात आला आहे. या संदर्भातील शिवसेना पक्षाच्यावतीने नियोजन बैठक पालकमंत्री दादाजी भुसे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना मध्यवर्ती कार्यालय नाशिक शहर-जिल्हा, मायको सर्कल येथे संपन्न झाली.

याप्रसंगी शिवसेना सहसंपर्क प्रमुख राजू लवटे, जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते, ग्रामीण जिल्हाप्रमुख भाऊलाल तांबडे, अनिल ढिकले, महानगर प्रमुख प्रविण तिदमे, ग्रामिण जिल्हा संघटक मंगला भास्कर, उप जिल्हाप्रमुख सुदाम डेमसे, शाम साबळे, दिगंबर मोगरे, शिवाजी भोर, शशिकांत कोठुळे, प्रमोद लासुरे, अमोल सूर्यवंशी, माजी नगरसेवक सुर्यकांत लवटे, आर. डी. धोंगडे, चंद्रकांत खाडे, माजी नगरसेविका सुवर्णा मटाले, मंदाकिनी जाधव, श्यामला दिक्षित, महेश जोशी, रोशन शिंदे, दिपक मौले, मामा ठाकरे, सुधाकर जाधव, अमोल जाधव, सचिन भोसले, नितीन साळवे, आनंद फरताळे, विक्रम कदम, नाना काळे, उमेश चव्हाण, आदित्य सरनाईक, कल्पेश कांडेकर, अमोल जोशी, योगेश बेलदार, दिगंबर नाडे, रुपेश पालकर, आदित्य बोरस्ते, किरण फडोळ, शुभम पाटील, सनी पगार, सीमा सिंघानिया, योगिता ठाकरे, कावेरी आत्रे, योगेश म्हस्के, विशाल साळवे, सनी रोकडे, नितीन देशमुख, भिवानंद काळे, योगेश धामणस्कर, शरदचंद्र नामपूरकर आदी शिवसेना, युवासेना, विद्यार्थी सेना पदाधिकारी उपस्थित होते.

शासन आपल्या दारी उपक्रमाचा उद्देश सरकारी सेवा आणि लाभ घेताना नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करणे हा आहे. शासकीय योजना आता आपल्या दारी येणार असून नाशिक जिल्ह्यातील जास्तीतजास्त लाभार्थ्यांना त्यांचा लाभ मिळवून देण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावे असे आवाहन पालकमंत्री दादाजी भुसे यांनी केले आहे. यावेळी जिल्हाप्रमुख अजय बोरस्ते यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यांच्या सरकारचे १ वर्ष पूर्ण झाले असून या एक वर्षात सरकारने महिलांना बस प्रवासात ५० टक्के सवलत, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, लेक लाडकी लखपती योजना, १ रुपयात पीक विमा, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, रोजगार निर्मिती योजना अशा जनसामान्यांसाठी राबवण्यात आलेल्या विविध योजनांचा जनतेला कसा फायदा झाला या विषयी माहिती दिली.

## धुळे जिल्ह्यातील पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**धुळे । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड यांनी जिल्ह्यातील पोलीस अधिकार्यांची खांदेपालट केली आहे. यात ०६ पोलीस निरीक्षक व ०३ सहाय्यक पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षकांनी कालच पोलीस अधिकार्यांच्या मुदतपूर्व बदल्यांबाबत आदेश काढला. पोलीस आस्थापना मंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था प्रशासकीय निकड व जनहितासाठी अधिकार्यांची खांदेपालट करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे. आझादनगर पोलीस ठाण्याचे पीआय प्रमोद पाटील यांची धुळे तालुका पोलीस ठाण्यात, धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पीआय दत्तात्रय शिंदे यांची जिल्हा वाहतूक शाखेत, शशिकांत पाटील यांची मोहाडी पोलीस ठाण्यात, साक्री पोलीस ठाण्याचे पीआय रविंद्र देशमुख यांची जिल्हा विशेष शाखेत, जिल्हा विशेष शाखेचे पीआय मोतीराम तुळशीराम निकम यांची साक्री पोलीस ठाण्यात, मोहाडी पोलीस ठाण्याचे एपीआय भूषण कोते यांची शहर वाहतूक शाखेत, शहर वाहतूक शाखेच्या एपीआय संगिता राऊत यांची देवपूर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली.


# वाढती लोकसंख्या मर्यादित संसाधनांवर अमर्यादित दबाव वाढविते

माणसाला समाजात उपजीविकेसाठी महत्वाचे घटक आणि चांगल्या विकासासाठी आवश्यक संसाधने अत्यंत गरजेची आहेत, जे मानवाच्या विकासासोबतच देशाच्या आणि मानवजातीच्या विकासालाही गती देतात. मूलभूत गरजांमध्ये शुद्ध ऑक्सिजन, पाणी, अन्न, कपडे, निवारा नंतर आरोग्य सेवा, शिक्षण, नोकरी, व्यवसाय आणि त्यानंतर सुखसोयींनी लक्झरी संसाधने आहेत. प्रत्येक माणसाला स्वतःचा विकास करण्याचा घटनात्मक अधिकार आहे, कायदे सर्वांसाठी समान आहेत. प्रत्येकाला विकासाच्या समान संधी मिळाल्या पाहिजेत. जगात फक्त तेच देश विकसित झाले आहेत, जे मर्यादित संसाधनांसह मर्यादित लोकसंख्येला चांगल्या सुविधा देऊ शकतात, कारण त्यांच्यावर अमर्याद गरजा पूर्ण करण्याचा दबाव नाही. जगातील अनेक छोटे देश आपल्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक विकसित आहेत, तेथे शुद्ध हवा, पाणी, अन्न तसेच रोजगार, शिक्षण, आरोग्य अशा चांगल्या सुविधा आहेत. दरवर्षी आपल्या देशातील लाखो विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी अशा देशांमध्ये जातात, तेथे त्यांना मोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळतात आणि चांगले जीवन जगतात.

आपल्या देशाची लोकसंख्या जगात सर्वात जास्त आहे आणि जितकी लोकसंख्या जास्त तितक्या गरजा जास्त. जेव्हा या गरजा योग्य पद्धतीने पूर्ण होत नाहीत, तेव्हा त्या गरजा नवीन समस्यांना जन्म देतात. नैसर्गिक संसाधनांचे अतिशोषणामुळे ग्लोबल वॉर्मिंग, नैसर्गिक आपत्ती वाढत आहेत, म्हणजेच मर्यादित संसाधनांवर अमर्याद गरजा भागवण्याचे दबाव उत्तम व्यवस्थेलाही बिघडवत आहे. यामुळे सामान्य माणसाचे जीवन जन्मापासूनच संघर्षमय बनते आणि हा संघर्ष आयुष्याच्या शेवटपर्यंत सुरूच असतो. वाढत्या लोकसंख्येमुळे शुद्ध हवा, पाणी आणि अन्नाचा प्रश्न झपाट्याने वाढतो, त्यानंतर चांगले शिक्षण, आरोग्य सुविधा, नोकरी किंवा व्यवसायासाठी संघर्ष होतो. त्यामुळे समाजात दारिद्र्य, उपासमार, रोगराई, निरक्षरता, बालमजुरी, बेरोजगारी, अंमली पदार्थांचे व्यसन, भ्रष्टाचार, गुन्हेगारी, घाणेरडे जीवनमान, झोपडपट्ट्या, प्रदूषण, अस्वच्छता अशा समस्या जन्माला येतात. आर्थिक विषमता झपाट्याने वाढत आहे. भेसळ, महागाई, फसवणूक यासारख्या समस्या शिगेला पोहोचल्या आहेत, कारण प्रत्येकजण स्वतःच्या फायद्यासाठी वाट्टेल ते करायला तयार आहे. त्यामुळे लोकांच्या विचारधारेत सतत नकारात्मकता वाढत जाते, ज्यामुळे वाईट प्रवृत्तींना जन्म मिळतो.

जागतिक लोकसंख्या दिन दरवर्षी ११ जुलै रोजी अधिक लोकसंख्येमुळे उद्भवलेल्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी आणि या समस्यांबद्दल लोकांना जागरूक करण्यासाठी साजरा केला जातो. युनायटेड नेशन्स वर्ल्डोमीटरच्या ताज्या



आकडेवारीनुसार ४ जुलै २०२३ पर्यंत भारताची सध्याची लोकसंख्या १,४२,०६,४४,७५९ झाली आहे आणि जगाची लोकसंख्या ८,०४,२३,४५,९१० च्या वर गेली आहे. आज भारताची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या १७.७% इतकी आहे, जेव्हाकी भारताचे एकूण क्षेत्रफळ जगाच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे २.४ टक्के आहे. कंट्री मीटरनुसार, सध्या २०२३ मध्ये भारताची लोकसंख्या दररोज ४९,१७९ व्यक्तींनी वाढत आहे. यूएनएफपीएच्या जागतिक लोकसंख्या अहवाल २०२३ नुसार, भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश बनला आहे. अहवालानुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येपैकी ६८ टक्के लोकसंख्या १५ ते ६४ वयोगटातील आहे, जी कोणत्याही देशाची कार्यरत लोकसंख्या मानली जाते.

भारत आता जागतिक स्तरावर वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. मानव विकास निर्देशांक मात्र त्या तुलनेत वाढलेला नाही. मानव विकास अहवाल २०२१-२२ नुसार, १९१ देशांपैकी भारत बांगलादेश आणि श्रीलंकेनंतर १३२ व्या क्रमांकावर आहे. भारतीय लोकसंख्येच्या शीर्ष १०% लोकांकडे ७७% पेक्षा जास्त संपत्ती आहे. हे खरं असूनही की इतर देशांच्या तुलनेत भारतात अन्नाची किंमत कमी आहे, तरीही भारतातील ७०% पेक्षा जास्त लोकसंख्येला २०२० पर्यंत सकस आहार घेणे शक्य झाले नाही. १५-४९ वयोगटातील सर्व महिलांमध्ये, ॲनिमियाचे प्रमाण २०१५-१६ (एनएफएचएस-४) मधील ५३% वरून २०१९-२१ (एनएफएचएस-५) मध्ये ५७% पर्यंत वाढले आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या ग्लोबल जेंडर गॅप रिपोर्ट २०२२ मध्ये भारत १३५ व्या क्रमांकावर आहे, ज्यानुसार स्त्रिया कर्मचारी केवळ २२% आहेत. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२३ नुसार, बंगळुरूमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स ही देशातील सर्वोच्च रँक असलेली संस्था आहे आणि जागतिक स्तरावर १५५ व्या क्रमांकावर आहे. आईक्यूएयर या स्वित्झर्लंडस्थित एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनीने नुकताच २०२२ चा वर्ल्ड एअर क्वालिटी रिपोर्ट प्रकाशित केला असून त्यात भारत हा जगातील आठव्या क्रमांकाचा सर्वात जास्त प्रदूषित देश असल्याचे समोर आले आहे. २०२२ च्या जागतिक बँकेच्या अहवालात म्हटले आहे की २०२० मध्ये (पहिल्या महामारीच्या वर्षात) जागतिक वाढीमध्ये भारताने ५.६ कोटी नवीन अत्यंत गरीब जोडले. जागतिक बँकेच्या डेटाबेसवरून असे दिसून आले आहे की भारतीय जगातील सर्वात गरीब लोकांमध्ये आहेत. त्याचे २७७७ डॉलर चे दरडोई उत्पन्न हे १२,२६३ डॉलर च्या जागतिक सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. केंद्र सरकार १ जानेवारी २०२३ पासून संपूर्ण वर्षभर राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत सुमारे ८१.३५ कोटी लाभार्थ्यांना मोफत अन्नधान्य पुरवत आहे. म्हणजे भारतात ऐवढ्या गरीब लोकांना मोफत रेशनची गरज आहे.

ग्लोबल हंगर इंडेक्स २०२२ मध्ये, भारत १२१ देशांपैकी १०७ व्या क्रमांकावर आहे, २९.१ गुणांसह, भारतातील तीव्र भूक पातळी दर्शवते. जागतिक आनंद निर्देशांक २०२३ मध्ये भारताचा क्रमांक १३६ पैकी १२६ वर जगातील सर्वात कमी आनंदी देशांपैकी एक आहे. सेंटर फॉर मॉनिटरिंग इंडियन इकॉनॉमी (सीएमआईई) ने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, मे महिन्यात भारतातील बेरोजगारीचा दर ७.७% होता. रिपोर्टर्स विदाऊट बॉर्डर्सने प्रकाशित केलेल्या वर्ल्ड प्रेस फ्रीडम इंडेक्स २०२३ मध्ये ३६.६२ गुणांसह भारत १८० देशांमध्ये १६१ व्या क्रमांकावर आहे, २०२२ मध्ये भारताचा क्रमांक १५० होता. ग्लोबल टेररिझम इंडेक्स २०२३ मध्ये, भारत देश दहशतवादाने प्रभावित असलेला १३ व्या क्रमांकावर आहे. ग्लोबल लिवेबिलिटी इंडेक्स २०२२ मध्ये भारताचा क्रमांक ११२ वा आहे. असमानता कमी करण्यासाठी वचनबद्धता निर्देशांक (सीआरआईआई) २०२२ मध्ये भारताचा क्रमांक १२३ आहे. लोकशाही अहवाल २०२२ मध्ये भारताचा क्रमांक ९३ आहे. क्यूएस सर्वोत्कृष्ट विद्यार्थी शहरे रँकिंग २०२३ मध्ये भारताचा क्रमांक १०३ वा आहे. ट्रान्सपरन्सी इंटरनॅशनलने नोंदवलेल्या २०२२ करप्शन परसेप्शन इंडेक्सनुसार, १८० देशांपैकी भारत हा ८५ वा सर्वात कमी भ्रष्ट देश आहे. ग्लोबल एन्व्हायर्नमेंट परफॉर्मन्स इंडेक्स २०२२ मध्ये भारताचा क्रमांक १८० आहे. आंतरराष्ट्रीय शस्त्रास्त्र हस्तांतरणाच्या ट्रेंडमध्ये भारत पहिल्या क्रमांकावर आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या २०२२ च्या जागतिक बहुआयामी गरीबी निर्देशांक (एमपीआई) अहवालानुसार, जगातील १११ देशांमध्ये सुमारे १२० कोटी लोक दारिद्र्यरेषेखाली आहेत. उप-सहारा आफ्रिका (सुमारे ५७९ दशलक्ष) आणि दक्षिण आशिया (३८५ दशलक्ष) हे विकसनशील प्रदेश आहेत ज्यात गरीबांची संख्या सर्वाधिक आहे. इंडिया स्किल्स रिपोर्ट २०२२ नुसार, निम्म्याहून कमी भारतीय रोजगारक्षम आहेत आणि ७५ टक्के कंपन्यांनी कौशल्यांमधील अंतर नोंदवले आहे.

वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी निसर्गाचा ऱ्हास होत आहे. जैवविविधतेची हानी, हवामान बदल, प्रदूषण, जंगलतोड, पाणी आणि अन्नाची कमतरता या सर्व गोष्टी आपल्या प्रचंड आणि सतत वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे वाईट झाल्या आहेत. देशात बेरोजगारीची परिस्थिती इतकी पसरली आहे की कोणत्याही सरकारी खात्यात सफाई कामगार किंवा शिपायाची भरती असली तरी हजारो उच्चशिक्षित पदवीधर, इंजिनीअर, एमबीए, पीएचडी पदवीधारकही अर्ज घेऊन येतात. अनेक विभागात वर्षानुवर्षे नवीन भरती होत नाही, कर्मचाऱ्यांची सेवानिवृत्ती सुरूच असते, तर अनेक ठिकाणी कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे देशाची लोकसंख्या खूप मोठी आहे, तरुणांची संख्या जास्त आहे ज्यांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य सुविधा, रोजगार, व्यवसाय आणि जीवनमान उंचावण्यासाठी योग्य संधी मिळाव्यात, जेणेकरून ते उत्कृष्ट नागरिक बनून देश आणि समाजाच्या विकासात योग्य ते योगदान देऊ शकतील.



डॉ. प्रितम भि. गेडाम
मो. ०८२३७४ १७०४१

## पश्चिम बंगालमधील हिंसाचार

ममतांचा राज्यकारभार, त्यांची प्रतिमा यावर हल्ला चढविण्याची एकही संधी भाजपकडून चुकवली जात नाही. अनेकदा ममतांच्या अतिआक्रमकपणातून ती संधी आपणहून पुरवली जाते.

पंचायत निवडणुकीदरम्यान पश्चिम बंगालमध्ये हिंसाचाराचा भडका उडाला. तेथे सत्तास्पर्धा एवढी टोकाला गेली आहे की, राजकीय पक्षाच्या नेत्या-कार्यकर्त्यांकडून लोकशाहीचे संकेत गुंडाळून ठेवले जातात. यात बळी सामान्य कार्यकर्त्यांचा जातो. निवडणुका शांततेत व्हाव्यात, ही साधी अपेक्षा. मात्र अस्वस्थतेने ग्रासलेल्या राजकारणात ती पूर्ण होणे कठीण झाले आहे. राज्यातील सत्ताधारी आणि केंद्रातील सत्ताधारी यांचे रणमैदान ही आता पश्चिम बंगालची ओळख बनली आहे. राज्यात डावे असोत की तृणमूल, हिंसाचाराच्या मालिकेत खंड पडत नाही, हे विशेष. आताच्या हिंसाचारात सोळाहून अधिक बळी गेले. त्यात तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांची संख्या अधिक आहे. बंगालमध्ये जिल्हा परिषदा, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीच्या सुमारे ७५ हजार जागांसाठी निवडणुका झाल्या. निवडणूक जाहीर झाल्यापासून हिंसक घटना सुरू आहेत. पूर्वी डावे पक्ष आणि काँग्रेस असा संघर्ष होता. आता तृणमूल विरुद्ध भाजप, या संघर्षातून राज्य ज्वालामुखीच्या तोंडावर उभे राहिले आहे! केंद्रीय सुरक्षा दलांच्या तैनातीवरून वाद झाला. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज प्रक्रिया सुरू असतानाच हिंसाचार उसळल्यावर कोलकाता उच्च न्यायालयाने केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या बंदोबस्तासाठी ठेवण्याचा आदेश दिला. मात्र या आदेशाची अंमलबजावणी करण्यास ममता तयार नव्हत्या! उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य निवडणूक आयोगाने आणि ममता सरकारने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. 'निवडणुका म्हणजे हिंसाचाराचा परवाना नव्हे' अशी टिप्पणी करीत सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला.

ममतांचा कांगावा

सहसा पंचायत निवडणुकीत केंद्रीय सुरक्षा यंत्रणा नसतात. राज्यातील ६१ हजार मतदान केंद्रांपैकी केवळ १८९ केंद्रे अतिसंवेदनशील असताना संपूर्ण राज्यात केंद्रीय सुरक्षा दलाच्या तुकड्या का? असा सवाल सत्ताधारी तृणमूल काँग्रेसकडून करण्यात आला. तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते विरोधी पक्षांच्या उमेदवारांच्या मार्गात जाणीवपूर्वक अडथळे निर्माण करतात, या आरोपाची मात्र दखल घेण्यास ममतांचे सरकार तयार नव्हते. त्याऐवजी ममतांकडून कांगावा केला जातो. ममतांचा राज्यकारभार, त्यांची प्रतिमा यावर हल्ला चढविण्याची एकही संधी भाजपकडून चुकवली जात नाही. अनेकदा ममतांच्या अतिआक्रमकपणातून ती संधी आपणहून पुरवली जाते. समजा निवडणुकीतील उमेदवारी अर्जांची प्रक्रिया शांततेत झाली असती, तर न्यायालयात आव्हान - प्रतिआव्हान देण्याची वेळ आली नसती. न्यायालयाच्या निर्णयामुळे भाजपला, अर्थात केंद्रनियुक्त राज्यपालांना बळ मिळाले. त्यांनी 'पीस रूम' या नावाने राजभवनात नियंत्रण कक्ष सुरू केला! निवडणुकीसंदर्भात नागरिकांच्या तक्रारी दाखल करण्यासाठीची व्यवस्था, हे कारण देण्यात आले. ही व्यवस्था आवश्यक असेल, तर ती जबाबदारी आणि अधिकार राज्य सरकारचे आहेत. ते राज्यपालांनी आपल्याकडे ओढून घेण्याचे कोणतेही कारण नव्हते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांचे बळी जाण्याची पश्चिम बंगालमधील ही काही पहिलीच वेळ नव्हे. २०१८ मध्ये तेथे झालेली स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक यावेळेपेक्षा अधिक रक्तरंजित होती. ज्या पद्धतीने निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली त्यावर टीकेची झोड उठली होती. तेव्हा तृणमूल काँग्रेसचे वर्चस्व होते. आता लोकसभा निवडणुका जवळ आल्याने त्या निवडणुकांची रंगीत तालीम, या दृष्टीने देखील आताच्या निवडणुकांकडे पाहिले जात आहे. निवडणुकीत चुरस निर्माण होण्यात आणि तुंबळ युद्धासारखी स्थिती निर्माण होण्यात तोच घटक मुख्य ठरला आहे. आधीच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तुलनेत भाजपची स्थिती कितीतरी चांगली आहे. पक्षाचे सत्तर आमदार आहेत. खासदारांची संख्या सोळाच्या घरात आहे. या निवडणुकीत प्रभावी कामगिरी बजावता आल्यास लोकसभेसाठी चांगली वातावरण निर्मिती होणार, हे उघड असल्याने भाजप चुरशीने निवडणुकीत उतरला. अस्तित्व जपण्यासाठी काँग्रेससह इतर पक्षही त्वेषाने मैदानात आले. परिणामी सुरक्षा यंत्रणांच्या पहाऱ्यात निवडणुका घेण्याची वेळ आली.

## वाढत्या हिंसाचारामागील आंतरराष्ट्रीय पैलू

आरक्षण, अतिक्रमणे आदी कारणांमुळे मणिपूरमधला हिंसाचार भडकत असला तरी एक वेगळे कारण पुढे आले आहे. जसा शेजारच्या म्यानमारचा संबंध मणिपूरच्या हिंसाचाराशी आहे, तसाच थायलंड, लाओस या देशांचाही असल्याचे उघड झाले आहे. मणिपूरमधील हिंसाचारामागील राजकीय कारणे काहीही असली तरी या भागातील अमली पदार्थांचा अवैध व्यापार धुमसत्या सामाजिक परिस्थितीला कारणाभूत असल्याची चर्चा आहे.


मणिपूरमधील बिघडलेल्या परिस्थितीमागे म्यानमार, लाओस आणि थायलंडच्या मोठ्या ड्रग माफियांचा थेट हात आहे. थायलंड आणि लाओसमधील ड्रग लॉर्डस्च्या सांगण्यावरून मणिपूरमधील स्थानिक लोक मोठ्या प्रमाणावर ड्रगच्या व्यापारात गुंतले आहेत. २०१७ ते २०२० या काळात या राज्यात २५१८ लोक मोठ्या ड्रग तस्करीत सामील असल्याचे आढळून आले. आकडेवारीनुसार, गेल्या पाच वर्षांमध्ये मुस्लीम समुदायातील सर्वाधिक १०८३ लोकांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर, कुकी समुदायातील ८७३ लोक अमली पदार्थांच्या व्यापारात सामील असल्याचे आढळून आले. मणिपूरमध्ये मैतेई समुदायातील ३८१ लोक बेकायदेशीरपणे अमली पदार्थांच्या व्यापारात गुंतलेले आढळले. या अवैध धंद्यामध्ये सहभागी असल्याबद्दल अन्य १८१ जाती, समाजातील लोकांना ताब्यात घेण्यात आले. कोरोनाच्या काळातही कुकी समुदायाशी संबंधित अमली पदार्थ विक्रेत्यांची संख्या वाढून १२७ झाली. २०२१ मध्ये १५१ तर २०२२ मध्ये कुकी समाजातील २८८ लोकांना तपास यंत्रणांनी अमली पदार्थांच्या व्यापारात अटक केली होती. २०१८ ते २०१९ दरम्यान कुकी समुदायाच्या तस्करांनी अमली पदार्थांच्या व्यवसायाला चालना दिली, तर मुस्लीम समाजातील तस्करांची संख्या थोडी कमी झाली.

म्यानमार, लाओस आणि थायलंडमधील अफूच्या तस्करांनी मणिपूरमधील सुपीक जमीन, स्वस्त मजूर, अंतर्गत कलह आणि बेरोजगारीचा फायदा घेतला. तेथील ड्रग्जचे मोठे व्यापारी आणि ड्रग कार्टेल मणिपूरमध्ये कायमस्वरूपी आणि तात्पुरते तळ बनवून लोकांची दिशाभूल करत आहेत. या व्यावसायिकांसाठी स्थानिक लोक केवळ पैशासाठी वेगवेगळ्या जाती, समाजातील लोकांना अफूच्या शेतीत सहभागी करून घेतात आणि नंतर त्यांच्या इशाऱ्यावर त्यांची तस्करीही करतात. मणिपूरमधला अमली पदार्थांचा व्यापार आता इतका पद्धतशीर झाला आहे की, ही व्यवस्था बेकायदेशीर असली तरी सर्व काही 'सिस्टीम'मध्ये आले आहे. यंत्रणा वेळोवेळी मोठी कारवाई करून अमली पदार्थांच्या अवैध व्यवसायात गुंतलेल्यांना तुरुंगातही पाठवतात. मणिपूरमध्ये १६ हजार एकरपेक्षा जास्त डोंगराळ जमिनीवर अवैध अफूची लागवड होते. मणिपूर सरकार आणि तपास यंत्रणा अशा अवैध शेतीवर सतत बुलडोझर चालवतात.

गेल्या काही दिवसांमध्ये मणिपूरमधल्या सात जिल्ह्यांमधील ६३० एकर जमिनीवर ६३०० किलो अफू नष्ट करण्यात आली. कमजोंग जिल्ह्यात ८० एकर जमिनीवरील ८०० किलो अफू नष्ट करण्यात आली तर चुरचंदपूर जिल्ह्यातील २२० एकर क्षेत्रावर २२०० किलो, कॅम्पपोंगजी जिल्ह्यातील १०० एकर जमिनीवर ११०० किलो, सेनापती जिल्ह्यातील १५० एकर क्षेत्रावर १५० किलो, उखरुल येथे ९० एकर क्षेत्रावर ९०० किलो आणि तेंगल चंद जिल्ह्यातील ३५ एकर क्षेत्रावर ३५० किलो अफू नष्ट करण्यात आली. नष्ट करण्यात आलेल्या अफूची आंतरराष्ट्रीय बाजारातली किंमत शंभर कोटी रुपयांहून अधिक होती. मणिपूरमधील न्यायालयाच्या आदेशानंतर आता मैतेई समुदायाच्या लोकांची जमिनीवरील हक्कांची व्याप्ती वाढेल. अशा स्थितीत त्यांच्या जमिनींवरील अवैध अफूची शेती संपण्याची भीती आहे. यामुळेच मणिपूरमधील परिस्थिती बिकट होत चालली आहे. अर्थात मणिपूरमधील परिस्थिती केवळ अमली पदार्थांच्या मोठ्या व्यापारामुळेच नव्हे, तर राजकीय अकार्यक्षमतेमुळेही बिघडली आहे. या संपूर्ण प्रकरणात दंगेखोरापर्यंत अत्याधुनिक शस्त्रे कशी पोहोचतात, याचा शोध घेतला पाहिजे. ही शस्त्रे आंतरराष्ट्रीय तस्करी करणाऱ्या सिंडिकेटने त्यांच्यापर्यंत पोहोचवली होती का, या प्रश्नाचे उत्तर शोधावे लागेल. तसे असेल, तर त्यातही थेट आंतरराष्ट्रीय ड्रग स्मगलर कार्टेल कनेक्शन असणे अत्यंत चिंताजनक आहे.

**समाप्त:**

## शब्दकोडे-११८



आडवे शब्द

१. दिवसाची चाकोरी (ला.) ५. तडीपार ७. बहुदा उसने बळ ९. जुगाराचा एक प्रकार १०. अमावस्या ११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग १२. गंध १४. नजरकैद, अटक १६. योग्य, बरोबर १८. संताप १९. रूक्ष, कोरडे २२. सेवक २३. मृत्यू नसलेला २४. बातमी २५. उत्तरदायित्व, जोखीम २७. किरकोळ सामान ३०. भार, बोजा ३१. शेवटचा पांडव ३३. गाडीचे छत ३५. विजार ३६. वरपांगी ३८. वटवट, त्रास ३९. पदर ४१. दरवाजा ४२. आरोप ४३. सवय, उत्तर दिशा ४४. देवाण-घेवाण ४८. आस, अक्ष ४९. बडबड्या ५०. प्रेत ५२. निवासस्थान ५३. सर्वांना सारखे प्रमाण ५५. रेचक ५६. वागणूक ५७. किंमत ५८. नवीन आलेला ६०. लहानच्या विरुद्ध ६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ ६२. दिवसभराचे एकूण काम ६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला? ६६. भांडण ६७. मस्ती, जोम ६८. पोते शिवण्याची जाड सुई ६९. खोदकाम ७१. पोपट ७३. सैन्याचा दाणागोटा ७४. वाळवी, उणीव ७५. अनौपचारिक सहभोजन

उभे शब्द

१. रम्य २. बाजार ३. बंगाली रुपाया ४. घर सोडून निघून जाणे ५. मावळ्यांची युद्धातील घोषणा ६. मर्यादा ७. स्थिती, दशा ८. वस्त्र, कापड ११. मध्यम प्रमाण १३. '--मंद झाल्या तारका, आता तरी येशील का' १५. सह, सोबत १७. थापा मारणारा २०. आवाजातील घोगरेणा २१. सज्ज २२. मोठा भाऊ २४. धडपड, प्रयत्न २५. आजूबाजूला २६. पावाचा गोल प्रकार २८. धडक २९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा ३१. संतोष आनंद ३२. आशीर्वाद ३४. अंदाज, तर्क ३७. नवरदेव ४०. चटकन ४२. सजावट ४४. अवडंबर, धैर्य ४५. उंबरठा ४६. सचिव, मुख्य ४७. किंमत ४८. अंब्याचे मिष्टान्न ४९. चणचण, न्यूनता ५१. मुलगा किंवा मुलगी ५३. चांगली वागणूक ५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ. ५५. धनको ५९. मरेपर्यंत ६०. मोजणी ६१. हास्याचे पीक ६३. सुसर ६४. उत्सव ६५. फुलातील पुंकेसर ७०. पुरुष ७२. वैताग (ला.)

### शब्दकोडे ११७ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.अपराध ५.रंजक ८.सडसडीत ११.जमा १२.रासगरबा १४.वलय १६.बरकत १९.पावा २०.परीट २१.जमादार २३.परकर २४.हिमालय २५.जीवनदान २७.धनवान २८.वावर २९.खलास ३०.गैर ३१.दरामदार ३३.चकोर ३५.साफ ३७.सदन ३९.रडकथा ४१.मका ४३.रामदास ४४.तथ्य ४५.पट्टा ४६.नवरानवरी ४८.सीमा ४९.कट्टी ५३.समर ५५.सान ५६.लता ५८.माव ५९.बडबडगीत ६३.नरकयातना ६५.सर ६६.संविधान ६७.काव ६८.नरमणे ७०.ममता ७१.नाना ७३.सांज ७४.मारुती ७५.छान ७६.रथयात्रा ७७.रडतराऊत ७८.ठेवा

**उभे उत्तर**

१.अढळपद २.राजवट ३.धमाल ४.तोरा ५.रंग ६.जर ७.कबाब ८.सडक ९.सखा १०.तलवार १३.समुदाय १५.यजमान १७.रतन १८.तपन १९.पाककला २२.माल २४.हिवाळा २५.जीव २६.वरदान २७.धनको २८.वारसदार २९.खरडट्टी ३२.दार ३३.चलनवलन ३४.रमराट ३६.फरारी ३८.दस ४०.कट्टा ४२.कान ४४.तमासगीर ४७.वतवतणे ४९.कर ५०.तनमनधन ५१.सांब ५२.तांब ५४.मत ५७.तारकनाथ ५८.माया ६०.डगर ६१.डसणे ६२.कविता ६४.कव ६६.संमती ६८.नजर ६९.मदत ७०.मरुत ७१.नार ७२.कुत्रा ७४.माऊ ७५.छावा

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# वृक्षसंपदेच्या रोपवेचे साधू, संत, ग्रामस्थ, पर्यावरण प्रेमींकडून उद्‌घाटन







नाशिक । प्रतिनिधी

पुण्यभूमी ब्रह्मगिरीची परवानगी नसल्याने खासदारांचा ३७५ कोटी रुपयांचा रोपवे वादात अडकलेला असतांना अंजनेरी ब्रह्मगिरीच्या आकाशातील जटायू महाराजांची सत्ता उलथवून येथे रोप वेचा घाट का घातला जात आहे? असा प्रश्न उपस्थित करत काल पर्यावरण प्रेमींकडून वृक्षसंपदेच्या रोपांच्या रोपवेचे ब्रह्मगिरी येथे उदघाटन करण्यात आले.



माता गोदेच्या अस्तित्वाने, शिवशंकराच्या जटांनी, प्रभू श्रीरामांच्या बाणाने, गौतम ऋशींच्या तपाने, नाथांच्या सहवासाने पावन तपोभूमी ब्रह्मगिरी जंगलाला, अंजनेरीच्या जटायूंना वृक्षांच्या रोपांच्या रोपवेची अधिक गरज असल्याचे फलक घेवून याबाबत पर्यावरण प्रेमींकडून काल जनजागृती करत वृक्षसंपदेच्या रोपवेचे आनंद आखाड्याचे स्वामी गणेशानंद सरस्वती महाराजांच्या हस्ते उघाटन करून सरकार व समाजाला ब्रह्मगिरी वृक्षरोपणाच्या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. पर्यावरण प्रेमींनी ग्रामस्थांच्या रोपवे विरोधातील ठरावाचा मान ठेवून रोपवेचा नाद सोडून ब्रह्मगिरी संवर्धनाचा ध्यास घेण्याचा इशारा शासन प्रशासनास दिला आहे. याप्रसंगी मेटघर ग्रामस्थ, हरित ब्रह्मगिरीचे ललित लोहगावकर, कैलास देशमुख, प्रकाश दिवे, जयंत दानी, जीवन आदी सदस्य व नाशिक मधील विविध संस्थांचे डॉ.संदीप भानोसे, भारती जाधव, कुलदीप कौर, निशिकांत पगारे, योगेश बर्वे, जगबीर सिंग, मनीष बाविस्कर आदी प्रतिनिधी उपस्थित होते.

आदिवासींची तसेच वनजमिनी गिळंकृत करून फार्म हाऊसच्या नावाने ब्रह्मगिरी पोखरला जात असतांना जनसेवकांना पर्यटनाची काळजी असेल तर ब्रह्मगिरीचा हा विश्वासघात सहन केला जाणार नाही असा स्पष्ट इशारा पर्यावरणप्रेमींनी सरकारला दिलेला आहे.

तपोभूमीची पवित्रता अबाधित राखण्यासाठी वृक्षसंगोपनाचे महत्व सरकारच्या लक्षात आणून देणे गरजेचे झालेले आहे असे सांगत ब्रह्मगिरीच्या पायऱ्यांवर वृक्षसंपदेच्या रोपांचा रोपवे तयार करून येथील वृक्षसंपदेसाठी सरकारने व समाजाने पुढाकार घेण्याचे आवाहन पर्यावरण प्रेमींकडून करण्यात येत आहे. अनेक भाविकांनी आपल्या नावाने एक तरी रोप ब्रह्मगिरी पर्वतावर लावण्याची इच्छा व्यक्त केल्याने याबाबतचे नियोजन करून पूर्ण करण्याचा संकल्प पर्यावरण प्रेमींनी घेतलेला आहे.

वृक्षसंपत्तीने समृद्ध विविध भारतीय प्रजातींच्या रोपांची लागवड या निमित्ताने ब्रह्मगिरी येथे करण्यात येणार आहे. तपोभूमी ब्रह्मगिरीचे पुनर्रवैभव प्राप्त करून देण्यासाठी हवेतील रोपवेची गरज नसून वृक्षसंपदेचा रोपवे योग्य पर्याय ठरेल यासाठी सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे. रोजगारनिर्मिती बरोबरच पर्यावरण संवर्धनासाठी येथील ग्रामस्थ मनरेगाच्या माध्यमातून वृक्षसंगोपनाचा प्रयत्न करत असतांना सरकारने सहकार्य करणे अपेक्षित आहे. देशाला सुजलाम सुफलाम करणाऱ्या माता गोदेच्या उगमस्थानीच उन्हाळ्यात हंडाभर पाण्यासाठी खोल विहिरींमध्ये उतरण्याचे दृश्य दरवर्षी दिसते. गेल्या वर्षी खुद्द पर्यावरण मंत्र्यांनी ब्रह्मगिरी गाठून जलजीवन योजनेतून येथील पाणी प्रश्न सोडविण्याचे आश्वासन ग्रामस्थांना दिलेले असतांना रोपवेचा नाद सोडून निवडून दिलेल्या जनसेवकांनी येथील नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणे जास्त गरजेचे आहे.

या भागावर जलदेवता प्रसन्न असतांना शासकीय-प्रशासकीय उदासीनता नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवू शकत नसेल तर येथे वृक्षसंपदेचे संगोपन अवघड काम ठरत आहे. जटायू पक्षांचा अधिवास धोक्यात घालून अंजनेरी ब्रह्मगिरी रोपवेची काय गरज का? असा प्रश्न घेवून पर्यावरण प्रेमींनी वनमंत्र्यांची भेट घेतली. वनमंत्र्यांच्या भेटीनंतर नाशिकचे जिल्हाधिकारी हे ब्रम्हगिरी अंजनेरी या पुरातन वनांचे संवर्धन करण्यासाठी ग्रामस्थांच्या ठरावाला मान देवून जटायू पक्षांचा अधिवास संपविणाऱ्या प्रस्तावित रोपवे विरोधात अहवाल वनमंत्र्यांना सादर करतील अशी अपेक्षा पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केली आहे. वृक्षसंपदेच्या रोपांमुळे गोदावरीची निर्मळता अखंडित राहणार आहे. कुंभमेळ्याची तयारी करत असतांना सरकारचे गोदावरीच्या उगमस्थानाकडे दुर्लक्ष होत आहे. लाखो भाविकांनी दुमदुमणाऱ्या ब्रह्मगिरीला लागलेले पर्यटनवाढीच्या रोपवेचे ग्रहण सोडविण्यासाठी येथील ग्रामस्थ व पर्यावरणप्रेमी प्रयत्नशील आहेत. पर्यटनवाढीच्या नावाने सरकारी योजनांचा वापर हजारो वर्षांच्या पायी पर्यटनाच्या धार्मिक परंपरा मोडीत काढून रोपवे करण्याचा घाट घालण्याचा प्रयत्न करून केंद्र सरकारची दिशाभूल केली जात असल्याचा सरळ-सरळ आरोप पर्यावरणप्रेमी करीत आहेत. वृक्षसंपदेची लागवड करून पर्यावरण रक्षणाबरोबर स्थानिकांना मोठ्या प्रमाणात शाश्वत रोजगार निर्मिती करणे सहज शक्य आहे. हवेतील रोपवेमुळे येथील आदिवासी बांधवांचे विस्थापन होवून त्यांचे पारंपारिक रोजगार संपविणे दुर्देवी ठरेल. वनसंपदेचा उपयोग येथील परंपरा, आदिवासी संस्कृती जपण्यासाठी करून माता गोदेचे पावित्र्य राखण्यास मदतच होईल असे पर्यावरणप्रेमींचे मत आहे.

# नाशिक कृउबाने बंद केलेले गेट उघडावे

## अन्यथा भाजपाचे गेट तोडो आंदोलन

नाशिक । प्रतिनिधी

नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीने त्यांच्या दिंडोरी रोडवरील मार्केटचे दक्षिणेकडील, इंद्रकुडाच्या बाजूचे गेट अचानक बंद केले आहे. त्यामुळे त्या परिसरातील व्यापारी, ग्राहक, छोटे दुकानदार, व्यावसायिक, शेतकरी यांचे अतोनात हाल होत आहेत. कोणतीही पुर्व सुचना न देता केवळ काही काळ वर्दळीमुळे सभापती यांचे वाहन अडकले म्हणून हे गेट बंद करण्यात आल्याचे कारण सांगितले जाते. परंतू हे कारण संयुक्तीक नसून आग रामेश्वर व बंब सोमेश्वर असा प्रकार असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यापुर्वीही बाजार समितीने पेठ रोडच्या बाजुचे गेट बंद केले आहे. त्यामुळे अनेक व्यापारी, व्यावसायिक रस्त्यावर आले असून रहदारीवरही ताण आलेला आहे. आता हे गेट बंद करून संचालक मंडळ पुन्हा एकदा सर्वांना वेठीस धरत आहे. हे चुकीचे असून जर ८ दिवसात बाजार समितीच्या संचालक मंडळाने गेट उघडण्याचा निर्णय घेतला नाही तर भाजपाच्या वतीने शेतकरी, व्यावसायिक, व्यापारी सर्वांना बरोबर घेवून गेट तोडो आंदोलन करून हे गेट उघडले जाईल असा इशारा भाजपा नाशिक महानगर सरचिटणीस सुनिल केदार, तपोवन मंडल अध्यक्ष चंद्रशेखर पंचाक्षरी, पंचवटी मंडल अध्यक्ष ज्ञानेश्वर काकड, भाजयुमो अध्यक्ष अमित घुगे यांनी दिला आहे.

वास्तविक या बाजार समितीचे तिन्ही गेट उघडे असायला हवे. परंतू केवळ दुराग्रह, वेठीस धरणे, शेतकरी, व्यापारी, व्यावसायिक यांना त्रास देण्याच्या उद्देशाने हे केले जाते. हे योग्य नसून याबाबत शासनाने सहकार व पणन विभागानेसुध्दा गांभीर्याने नोंद घ्यावी व संबंधीतांना सुचना करावी व दोन्ही गेट उघडण्यास सांगावे. अन्यथा नाईलाजास्तव आम्हाला सर्वांना बरोबर घेवून गेट तोडो आंदोलन करून हे दोन्ही गेट मोकळे करावे लागतील असा इशारा केदार यांनी पत्रकान्वये दिला आहे.


ॲड.अर्जुन ए. पाटील
निशाणी नं.६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८१६/२०२३

संगीता कैलास पाटील वगैरे .....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ...सामनेवाला
कैलास शंकर पाटील ...मयत

ज्याअर्थी अर्जदार यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. सो. धुळे यांचे कडे दि. ४/७/२०२३ रोजी कि. दि. अर्ज. नं. ८१६/२०२३ चा अर्ज मयत कैलास शंकर पाटील यांचे कायदेशीर वारस आहेत. मयत कैलास शंकर पाटील यांचे नावे मौजे सावई येथील शेत गट नं. १६५ / ३ क्षेत्र ० हे. ३६ आर + ० हे. ०४ आर असे एकुन क्षेत्र ० हे. ४०आर असुन त्यांना अर्जदार नं. १ व २ असे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि.०९/०८/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कोर्ट नं. ६ सो. धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- ०६/०७/२०२३

कामगिरी कारकुन, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायाधीश क. स्तर, धुळे


# पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी डॉ.सुनील ढिकले यांची निवड झाल्याने सत्कार



**नाशिक । नाशिक जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुनील ढिकले यांची बिनविरोध निवड करण्यात आली. याबद्दल त्यांचा सत्कार करतांना भाजप नाशिक महानगर अध्यक्ष गिरीश पालवे, भाजप प्रदेश प्रवक्ते व ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, सरचिटणीस सुनील केदार, संतोष नेरे, चारुदत्त आहेर, गौरव घोलप, राम डोबे आदी उपस्थित होते.**

# गड, किल्ल्यांवर गैरवर्तन केल्यास होणार कारवाई : अधीक्षक गर्जे

नाशिक । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील गड, किल्ले हे राज्याच्या सुवर्ण इतिहासाचे साक्षीदार आहेत. त्यांचे पावित्र्य राखणे हे प्रत्येकाचे आद्य कर्तव्य आहे. अशा पुरातन वास्तूंच्या ठिकाणी कोणी इसम मद्यसेवन करून गैरशिस्तीने वागल्याचे आढळून आल्यास महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ अन्वये कारवाई करण्यात येणार असल्याचे नाशिकचे राज्य उत्पादन शुल्क अधीक्षक यांनी कळविले आहे. गड, किल्ले या ठिकाणी व्यक्ती मद्यसेवन करून गैरशिस्तीने वागतांना आढळल्यास नागरिकांनी नाशिक अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क कार्यालयाच्या ०२५३-२५८१०३३ या दूरध्वनी क्रमांकावर तसेच आयुक्त राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई कार्यालयाच्या १८००२३३९९९९ या टोल फ्री क्रमांकावर व ८४२२००११३३ या व्हॉट्‌प क्रमांकवर संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

# 'जीवनसार सूत्र' ग्रंथातून भाविकांना मिळणार अनेक प्रश्नांची उत्तरे

**पद्मश्री दादा इदाते ; पुस्तक प्रकाशन सोहळा उत्साहात**



नाशिक । प्रतिनिधी

आज सोप्या , सर्वांना समजेल अशा भाषेत ज्ञानेश्वरी , गाथासह अध्यात्म सांगण्याची गरज आहे. अशाच प्रकारचे कार्य संत साहित्याचे अभ्यासक डॉ तुलसीराम महाराज गुट्टे करत असल्याबद्दल त्यांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. त्यांनी लिहिलेल्या 'जीवनसार सूत्र' ग्रंथातून भाविकांना त्यांच्या प्रश्नांची उत्तरे मिळतील असा विश्वास पद्मश्री दादा इदाते यांनी केले.

सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनतर्फे पुस्तकं प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. छत्रपती संभाजीनगर मार्गावरील साई लिला लॉन्स येथे झालेल्या कार्यक्रमात व्यासपिठावर पद्मश्री दादा इदाते, डॉ दे. घ.मुंडे , वैद्यनाथ सहकारी साखर कारखण्याचे संचालक संजय आघाव, अनिल फड, भाजपचे शहराध्यक्ष गिरिश पालवे, ज्येष्ठ नेते लक्ष्मण सावजी, हेमंत धात्रक, गुरुदेव कांदे, दामोदर मानकर , रमेशचंद्र घुगे, ज्येष्ठ उद्योजक बुधाजी पानसरे, सुनिल केदार, बंडू नाना भाबड, नगरसेविका पुनम सोनवणे, उपस्थित होते. अध्यक्षस्थानी परळी वैद्यनाथ येथील ज्येष्ठ डॉक्टर हरिश्चंद्र वंगे होते.

अध्यक्षस्थानाहून डॉ. वंगे यांनी डॉ.गुट्टे महाराज यांचे साहित्य सर्वच घटकांसाठी उपयुक्त आहे. त्यांनी पुढील काळात आणखी साहित्यसंपदा वाढवावी असे आवाहनही केले. पुस्तकाचे लेखक डॉ गुट्टे महाराज यांनी आतापर्यंत लिहिलेल्या पुस्तकांविषयी माहिती दिली. साहित्य संपदा आणि अध्यत्मिक कार्यात आलेले अनुभव व झालेल्या मदती विषयी त्यांनी माहिती दिली. कार्यक्रमास सिद्धिविनायक मानव कल्याण मिशनचे सचिव शाम पिंपरकर, संजीव अहिरे, विजय सोनवणे, सोमनाथ बोडके,दिलीप अहिरे गणपत हाडपे, अनिल सांगळे, अभिमान हडपे, ठेकचंद पाटील,, विनायक सांगळे, बाळकृष्ण नागरे, , संदीप तांदळे आदींसह सर्व पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. सुत्रसंचलन सचिन खुडे यांनी तर सेवानिवृत्त पोलिस अधीक्षक विजय सोनवणे यांनी आभार मानले

# विश्वास बँकेचे प्रसाद पाटील यांचा राष्ट्रीय परिषदेत सहभाग

नाशिक । प्रतिनिधी

नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया (एन.सी.यु. आय.) यांचेतर्फे नवी दिल्ली येथे १७ वी भारतीय सहकारी काँग्रेस, भारतीय सहकारी चळवळीची राष्ट्रीय परिषद प्रगती मैदान येथे संपन्न झाली. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत या राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह अध्यक्षस्थानी होते. या परिषदेसाठी भारतातून नागरी सहकारी बँकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून एकमेव विश्वास को-ऑप. बँक लि., नाशिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रसाद विजय पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. आधुनिक तंत्रज्ञानाचा सहकारातील सुशासनासाठी प्रभावी वापर विषयावरील परिसंवादात आपले विचार मांडण्यासाठी निमंत्रित वक्ते म्हणून नॅशनल को-ऑपरेटिव्ह युनियन ऑफ इंडिया या संस्थेने त्यांना आमंत्रित केले होते. देशभरातील सहकारी संस्थांचे सुमारे ६,००० प्रतिनिधी, विविध देशांतील प्रतिनिधी, सरकारी अधिकारी, सहकारातील संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



या परिषदेचे सूत्र होते 'अमृत काल : प्रॉस्पॅरिटी थ्रू को-ऑपरेशन फॉर अ व्हायब्रंट इंडिया' तर या परिषदेच्या निमित्ताने आयोजित केलेल्या परिसंवादात 'आधुनिक तंत्रज्ञानाचा सहकारातील सुशासनासाठी प्रभावी वापर' या विषयावरील परिसंवादात आपले विचार व्यक्त करण्यासाठी प्रसाद पाटील यांना निमंत्रित वक्ते म्हणून निमंत्रित करण्यात आले होते. या परिसंवादाचे अध्यक्ष, नॅशनल बँक ऑफ ॲग्रीकल्चर ॲण्ड रूरल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष (नाबार्ड) मा. शाजी के. व्ही. हे आहेत. तसेच या परिसंवादाचे प्रमुख वक्ते अमरेली जिल्हा को-ऑप. दुध उत्पादक संघ गुजरातचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. आर. एस. पटेल हे होते.

या परिषदेसाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे संचालक सतिश मराठे, नॅशनल को-ऑप. युनियन ऑफ इंडियाचे अध्यक्ष दिलीप संघानी, नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑप बँक्स् ॲण्ड क्रेडीट सोसायटीज लि. (नॅफकब) चे अध्यक्ष ज्योतिंद्र मेहता, विश्वास को-ऑप. बँकेचे संस्थापक अध्यक्ष विश्वास जयदेव ठाकूर, विश्वास को-ऑप. बँकेचे उपाध्यक्ष अजित मोडक, मानद कार्यकारी संचालक मंगेश पंचाक्षरी तसेच भारतातील सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.


प्रोसेस जमा
ॲड. व्ही. आर. वर्मा, धुळे
निशाणी नं.६

**जाहिर नोटीस**

**धुळे येथील मे.२ रे सिव्हील जज्ज सो. (सि.डी.) यांचे न्यायालयात**

दि.कि. अर्ज नं. ८३०/२०२३

श्रीमती अनिता आनंदा गवळी, वगैरे ५ .....अर्जदार
विरुध्द
कोणीही नाही ...जाबदेणार
कै. आनंदा ठकाजी गवळी ...मयत

ज्याअर्थी दि. ७/७/२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार नं. १ ते ५ हे मयत आनंदा ठकाजी गवळी यांचे कायदेशीर वारस आहेत. तसेच मयत आनंदा ठकाजी गवळी यांचे नावे मौजे पाडळदे, ता.जि. धुळे येथे शेतजमीन गट नं. १०६/२ असून तिचे क्षेत्रफळ ० हे. ४० आर. असे आहे. यासंदर्भात वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख १८/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश सो. क्रमांक २.. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवुन सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

सदर नोटीस मे, न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : १०/७/२०२३

कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे — (शिक्का) — अधिक्षक, दिवाणी न्यायालय, व. स्तर, धुळे

## न्यूज कॉलम

### जवाहर नवोदय परीक्षेत प्रश्रब्धी सोनवणे जिल्ह्यात प्रथम

**धुळे ।** धुळे शहरातील यशवंत इंग्लिश मीडियम स्कूलमधील प्रश्रब्धी राजेश सोनवणे या विद्यार्थिनीने जवाहर नवोदय विद्यालय परीक्षेत नेत्रदीपक यश मिळविले. ती सर्वसाधरण प्रवर्गातून प्रथम आली आहे. प्रश्रब्धीने सातारा सैनिकी स्कूलद्वारा घेण्यात आलेल्या परीक्षेत तसेच गुजरात पालमपूर सैनिकी स्कूलद्वारा घेण्यात आलेल्या परीक्षेतही यश संपादन केले आहे. ि तिच्या यशाबद्दल शाळेचे अध्यक्ष बी. एस. पगारे, मुख्याध्यापक, शिक्षक आदींमधून समाधान व्यक्त होत आहे.

### पटेल प्राथमिक शाळेत रांगोळी स्पर्धा

**शिरपूर ।** येथील आर. सी. पटेल मराठी प्राथमिक शाळेत माझी वसुंधरा अभियानांतर्गत पहिली व दुसरीच्या वर्गातील विद्यार्थी, शिक्षक व पालकांसाठी रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. माजी नगराध्यक्षा संगीता देवरे, मीनाक्षी राठी, दिव्या जैन, चारू पाटील, सुषमा पवार, मुख्याध्यापक सी. डी. पाटील उपस्थित होते. गटनिहाय विजेते असे पालक गट : कल्पना प्रवीण माळी (प्रथम), वैशाली विकास राजपूत (द्वितीय), पूजा विनोद भोजने (तृतीय), मनीषा अविनाश पवार (उत्तेजनार्थ). उज्ज्वला सोनवणे, पूनम सूर्यवंशी यांनी परीक्षण केले. महेंद्र माळी यांनी सूत्रसंचालन केले. गजेंद्र जाधव यांनी आभार मानले.

# लोंबकळलेल्या तारांमुळे अपघाताची शक्यता

## नागरिकांची महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे धाव



**चिमठाणे । प्रतिनिधी**

शिंदखेडा येथील साईलीला नगर येथे खांबावरील विद्युत तारा खाली लोंबकळलेल्या अवस्थेत आहेत. लोंबकळलेल्या विद्युत तारांमुळे पावसाळ्यात वादळामुळे या तारा तुटून विजे मुळे जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीती चे वातावरण निर्माण झाले आहे. सदर विद्युत तारांचे काम लवकरात लवकर करण्यात यावे व अपघात होऊ नये म्हणून उपाययोजना करण्यात यावी यासाठी साईलीला नगरातील नागरिकांनी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे धाव घेतली.

साईलीला नगर कॉलनी परिसरात ठिकठिकाणी विद्युत तारा लोंबकळलेल्या अवस्थेत आहेत तर अरुण चौधरी यांच्या घराजवळील तारा त्यांच्या कंपाउंड पर्यंत खाली आलेल्या आहेत. त्या कंपाऊंड वॉल ला स्पर्श करण्याची शक्यता आहे. त्यामुळे वापरताना नागरिकांना काळजीपूर्वक लक्ष देऊन ये जा करावी लागते तर त्या परिसरात विद्युत तारा घरापर्यंत लोंबकळून आलेले असल्यामुळे लहान मुलं खेळण्यासाठी बाहेर असताना काळजी घ्यावी लागत आहे. तसेच परिसरात ठिकठिकाणी विद्युत तारा खाली लोंबकळले असून मुक्या जनावरांचे अपघात होण्याची शक्यता आहे.

काही ठिकाणी खांब्यावर आर्थिंग लागू नये म्हणून टाकण्यात आलेले चिनी मातीचे झंपर फुटलेल्या अवस्थेत आहेत.डीपी च्या आतील कट आउट विस्कळलेल्या अवस्थेत आहेत.एक पोल पासून दुसऱ्या पोलाचे अंतर कमी जास्त प्रमाणात आहे. त्यामुळे विद्युत तारा लोंबकळलेले आहेत. पोलाची उंची ११ मीटर पर्यंत असावी एक मीटर जमिनीत व दहा मीटर जमिनीवर असावे परंतु काही ठिकाणी खांब्यांची उंची कमी जास्त आहे. विद्युत खांब एका लाईनीत नसल्यामुळे घर बांधकामास अडथळा निर्माण होत आहे. कॉलनीतील रहिवाशी राजेंद्र बडगुजर यांच्या घराच्या बांधकामास ११ के वी तारेमुळे अडथळा येत आहे. त्यामुळे विद्युत तारांचे खांब सरकविण्यासाठी त्यांना एकूण ७५ हजार रुपये कंत्राटदारास मोजावे लागत आहे. खांब्यांची व तारांची क्वालिटी निकृष्ट असल्याची परिसरातील नागरिकांची तक्रार आहे.सदर कॉलिटी तपासणीचे काम अतिरिक्त कार्यकारी अभियंता यांचे असून त्यांनी ले आऊट करते वेळेस चांगली तपासणी केली नाही अशी चर्चा नागरिकांमध्ये आहे.सदर विद्युत खांब व तारा निकृष्ट असल्यामुळे बंच केबल टाकण्यात यावी अशी मागणी परिसरातील नागरिकांनी अधिकाऱ्यांकडे केली आहे. सहाय्यक अभियंता निलेश पवार यांनी साईलीला नगरातील समस्या जाणून घेतल्या व लवकरच कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले. या वेळी परिसरातील गुलाबराव बडगुजार, सतीश मुळे, संतोष वाघ, अरुण चौधरी, विरू चौधरी, नरेंद्र बडगुजर, पिंटू बडगुजर, खुशाल चौधरी आदी उपस्थीत होते.

# नदी स्वच्छता, पाणी वाचवण्याचा संदेश देत नाशिक ट्रान्सपोर्टचे सुभाष जांगडा धावले

**नाशिक ते त्र्यंबकेश्वर ३१ किमी अंतर न थांबता ३ तास २६ मिनिटात केले पूर्ण**



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे पदाधिकारी सुभाष जांगडा यांनी काल नदी स्वच्छता व पाणी वाचवाचा संदेश देण्यासाठी नाशिक ते त्र्यंबकेश्वर ३१ किमी अंतर न थांबता ३ तास २६ मिनिटात पूर्ण केले. काल पहाटे पाच वाजून ३० मिनिटांनी रामकुंड पंचवटी येथून नाशिक ते त्र्यंबकेश्वर धावण्यास त्यांनी सुरुवात केली. यादरम्यान ते आपल्या सोबत गंगोत्री, यमुनोत्री, हरिद्वार व हिमालय कैलास मानस सरोवर व रामकुंड गोदावरीतील जल असलेल्या जलकुंभाने त्र्यंबकराजास जलाभिषेक केला.

यावेळी त्र्यंबकेश्वर येथे नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष राजेंद्र फड, वरिष्ठ सल्लागार जयपाल शर्मा, राजेश इसरवाल, राजेश शर्मा, राजेंद्र साहानी, राजबाला शर्मा,गंगा जांगडा, रुपाली मोंढे, योगिता निकम, प्रणिता तुंगार यांनी उपस्थित राहून त्यांचा सत्कार केला. नाशिक ट्रान्सपोर्ट असोसिएशनचे पदाधिकारी सुभाष जांगडा यांनी या अगोदर नाशिक ते शिर्डी धावत बेटी बचाव बेटी पढाव, झाडे लावा झाडे जगवा यासह विविध विषयांवर प्रबोधन केले आहे. काल ते नदी स्वच्छता व पाणी वाचवाचा संदेश देत नाशिक ते त्र्यंबकेश्वर धावले. यादरम्यान त्यांनी आपल्या सोबत गंगोत्री, यमनोत्री, हरिद्वार, कैलास मानस सरोवर, गोदावरीचे तीर्थ घेऊन सकाळी रामकुंड येथून ५:३० वाजता सुरवात करून ८:५६ वाजता त्र्यंबकेशवर येथे त्र्यंबकराजास जलाभिषेक केला. त्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# धुळ्यातील एआयटी उर्दू शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**धुळे । प्रतिनिधी**



शहरातील अंजुमन ईशाते तालीमव्दारा संचलित एआयटी उर्दू प्राथमिक शाळेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कार्याध्यक्ष आ.कुणाल पाटील यांचे विशेष कार्य अधिकारी श्री प्रकाश तात्या पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. उर्दू प्राथमिक शाळेतील शिक्षक मुस्तफा सर यांनी स्वखर्चाने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिले होते. कार्यक्रमात श्री प्रकाश पाटील यांनी या शाळेसाठी शैक्षणिक मदत म्हणून एकूण १० हजार रुपयाची देणगी जाहिर केली. त्याअनुषंगाने प्रकाश पाटील यांचे सचिव शकील अहमद शाहीन यांनी आभार मानले. याप्रसंगी प्रणव पाटील,मुख्याध्यापिका हलीमा मॅडम,मुख्याध्यापक मुश्ताक सर आदी उपस्थित होते.

# सुख, शांती, प्रेम हाच खरा जीवनाचा आनंददायी मार्ग : वासंती दीदी

**शांतीनगरमध्ये ब्रह्माकुमारीज् राजयोग शिबिर**



**नाशिक । प्रतिनिधी**

माणसाच्या जीवनात जे सुख दुःखाचे प्रसंग येतात हा भाग्याचा दोष नसून त्याने केलेल्या कर्माचे फळ आहे. जर जीवनात सुख-शांती आणि आनंद प्राप्त करायचा असेल तर शिव परमात्म्याने दिलेल्या ज्ञानानुसार प्रामाणिकपणे मार्गक्रमण केल्यास आयुष्यात सुख, शांती, प्रेम हाच खरा जीवनातील आनंदाचा मार्ग आहे हे समजेल. त्यामुळे कोणत्याही कठिण परिस्थितीलाही सहज सामोरे जाऊ शकतात. प्रत्येक कार्य सहज व सुखी, आनंददायी वाटू लागते असे प्रतिपादन प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या जिल्हा मुख्य संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी वासंती दीदी यांनी केले.

यावेळी बाळासाहेब सोनवणे यांनीही मनोगतात ब्रह्माकुमारीमध्ये शिकवल्या जाणाऱ्या मेडिटेशनमुळे ताण-तणाव, चिंता, नैराश्य आणि वेदना लक्षणीयरीत्या कमी होऊन सुख, शांती, आनंद मिळतो हे आलेल्या अनुभवावरून व्यक्त करत जीवनात मेडिटेशनची आवश्यकता विशद केली. व्यसनाधीनतेच्या कारणामुळे कौटुंबिक स्थिती, बेरोजगारी, शारीरिक आरोग्य खराबी, गुन्हेगारीचे प्रमाण, मानसिक आजार आदी परिस्थिती निर्माण होत असते. या कार्यक्रमाचे निवेदन समीना बहेन यांनी केले. या लघु नाटिकेत कस्तुबभाई, संतोषभाई, गिरीशभाई, निखिलभाई, निलेशभाई आदींनी सहभाग घेतला होता. यावेळी या राजयोग शिबिरात श्रीकांत डुबेरकर, वामन शिरसाठ, मोहन ताडगे, किशोर भाऊटे, सागर डुबेरकर, आदींसह शांतीनगर परिसरातील भाई-माता मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आर्वी येथे पुण्यस्मरणानिमित शालेय साहित्याचे वाटप

**आर्वी । प्रतिनिधी**



आर्वी येथील माजी सैनिक योगेश नानकर हे सामाजिक कार्यीत नेहमी अग्रेसर असतात योगेश नानकर यांच्या पत्नीचे गेल्या तीन वर्षांपूर्वी दुःखद निधन झाले होते. एकीकडे सेवावृत्तीचे आनंद घरात असताना त्यांचे पत्नीचे अकाली मृत्यू झाला. त्यांच्या पत्नीचे चौथे पुण्यस्मरण दिनानिमित्त आर्वी येथील जिल्हा परिषद शाळा येथे वह्या पुस्तके पेन वाटप केले त्याच्या या सामाजिक कार्यीचे सर्वत्र कौतुक होत आहे. योगेश नानकर हे सेवानिवृत्त झाल्यापासून आर्वी गावात अनेक सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. पोलिस सैन्य दलाचे मोफत प्रशिक्षण आर्वीतील तरुणांना देत असतात त्यांच्या या प्रशिक्षणाचा अनेक तरुणांना मोठा फायदा झाला.

या प्रशिक्षणातून आता पर्यंत आर्वी गावातील दहा तरुणांची पोलिस भरती आणि सैन्य दलात निवड झाली. त्याच्या या मोफत प्रशिक्षणाची दखल घेत अनेक सामाजिक संस्थांनी त्यांना विविध क्षेत्रातील पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आपल्या पत्नीची आठवण आपल्या मनात कायम राहावी म्हणून नेहमी सामाजिक उपक्रम राबवित असतात गोरगरीबांना नेहमी मदतीचा हात पुढे असतो. मोफत पोलिस सैन्य दलाचे प्रशिक्षण गोरगरीब विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके पेन वाटप करुन सामाजिक बांधिलकी जोपासत आहेत. यावेळी मुख्याध्यापक प्रवीण भदाणे, सोनाली हिरे, निलीम पाटील, मुरलीधर नानकर, धमैश देवरे, महेंद्र देवरे, संजय महाराज, सामाजिक कार्यकर्ते नंदकुमार बागले, आकाश बागले, प्रशांत गर्दे, बबलू धोंडगे, सागर पाटील, प्रविण गर्दे, प्रमोद देवरे सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आरोग्यदायी जीवनासाठी मूत्रपिंडाचे कार्य सुरळीत ठेवणे गरजेचे: डॉ.देवगांवकर

**आधार ज्येष्ठ नागरिक संघात मुत्रविकारावर व्याख्यान**



**नाशिक । प्रतिनिधी**

आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी मूत्रपिंडाचे कार्य सुरळीत पध्दतीने होणे गरजेचे असते, परंतु योग्य काळजी घेतली नाही तर मुत्रपिंडाचे विकार जडतात अन् जीवन त्रासदायक होऊन बसते. आहारातील मिठाचे प्रमाण कमी करून फास्टफूड टाळावे. तसेच मधुमेह नियंत्रणात ठेवल्यास किडनी विकाराचा त्रास टाळता येणे शक्य असल्याचे प्रतिपादन डॉ. पार्थ देवगांवकर यांनी केले.

येथील आधार ज्येष्ठ नागरिक संघात आयोजित व्याख्यानात डॉ. देवगांवकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर दिवाकर जोशी, गुलाब चौधरी, लोकज्योतीचे कोषाध्यक्ष जितेंद्र येवले, प्रताप राजपूत होते. सुरुवातीला प्रास्ताविकातून दिवाकर जोशी यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. डॉ. देवगांवकर म्हणाले की, मूत्रपिंड विकाराची कारणे व प्रकार खूप आहेत. या सर्वात महत्वाचे लघवीचे प्रमाण कमी होते. डायबेटीस, उच्चरक्तदाब, मुत्रपिंडांचा संसर्ग आदी कारणामुळे मुत्रपिंडाच्या कामावर परिणाम होऊ शकतो. यावर तातडीने उपचार केले नाही तर मूत्रपिंडाचे काम पूर्ण थांबू शकते. यावेळी संघाच्या सभासदांचा वाढदिवस मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन करण्यात आला. याप्रसंगी संघाचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठा सेवा संघाच्या महाराष्ट्र प्रदेश सहसचिवपदी चंद्रशेखर भदाणे

**धुळे । प्रतिनिधी**




मराठा सेवा संघाच्या महाराष्ट्र प्रदेश सहसचिवपदी चंद्रशेखर भदाणे(बोरकुंड) यांची निवड करण्यात आली. श्री.भदाणे हे बोरकुंड येथील रहिवाशी असुन गेल्या २५ वर्षापासुन ते चळवळीत कार्यरत असुन सामाजिक क्षेत्रात त्यांचे मोठे योगदान आहे. संभाजी ब्रिगेड व मराठा सेवा संघात केलेल्या कामाची दखल घेत श्री.भदाणे यांची ही निवड करण्यात आली. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे झालेल्या मराठा सेवा संघाच्या बैठकीत हे नियुक्तीपत्र देण्यात आले.

छत्रपती संभाजीनगर येथील जिजाऊ संकुलच्या सभागृहात झालेल्या या बैठकीस सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांच्यासह मराठा सेवा संघाचे संस्थापक महासचिव निर्मलकुमार देशमुख, माजी आमदार रेखाताई खेडेकर, राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार, मराठा सेवा संघाचे प्रदेश अध्यक्ष विजयकुमार घोगरे, महासचिव चंद्रशेखर शिखरे, कार्याध्यक्ष नवनाथ घाडगे, ज्येष्ठ मार्गदर्शक अर्जुनराव तनपुरे, सेवा संघाचे उपाध्यक्ष शेखर गायकवाड, संभाजी ब्रिगेडचे महासचिव सौरभ खेडेकर, संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते व विचारवंत गंगाधर बनबरे, आदी मान्यवर उपस्थित होते. बोरकुंड या स्वातंत्र्य सैनिकांच्या भूमीतुन चंद्रशेखर भदाणे यांनी पंचवीस वर्षापूर्वी सामाजिक कार्यास सुरुवात केली. सन २००० यावर्षी मराठा सेवा संघाचे सर्वे सर्वा पुरुषोत्तम खेडेकर यांच्या विचारांनी प्रेरित होवून श्री.भदाणे यांनी मराठा सेवा संघाच्या व संभाजी ब्रिगेड संघटनेच्या कामास सुरुवात केली. तळागाळातील युवकांना संघटीत करत त्यांनी उत्कृष्ट संघटन कौशल्याच्या बळावर जिल्ह्यात चांगले काम उभे केले. चंद्रशेखर भदाणे यांनी संभाजी ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षपदाची सूत्र स्विकारल्यानंतर युवकांचे संघटन उभारत संभाजी ब्रिगेडच्या झेंड्याखाली एकत्र आणले आणि तरुणांमध्ये नेतृत्वक्षमता विकसित केली. विविध आंदोलनाच्या माध्यमातून अनेकांचे प्रश्न सोडविले. मराठा आरक्षण चळवळीत आक्रमक भूमिका घेत धुळे जिल्ह्यात मोठे जनआंदोलन उभारणे, जाणता राजा नाटकाला राज्यात पहिला ऐतिहासिक विरोध यासारखी आंदोलने केली. धुळ्यात झालेले संभाजी ब्रिगेडचे भव्य राज्यस्तरीय अधिवेशन आदी त्याकाळी गाजली होती. त्यानंतर मराठा सेवा संघ जिल्हाध्यक्षपदाच्या काळातही त्यांनी अनेक उपक्रम राबविले. चार वर्षापूर्वी बोरकुंड येथे झालेले मराठा सेवा संघाचे पहिले राज्यस्तरीय ग्रामीण महाअधिवेशन श्री.भदाणे यांच्या अध्यक्षपदाच्या काळातच झाले होते. याप्रसंगी मराठा सेवा संघाचे धुळे जिल्हाध्यक्ष संदीप पाटील, संजय पाटील, प्रा.वैशाली पाटील, रामकृष्ण पाटील आदी उपस्थित होते. बोरकुंड संभाजी ब्रिगेडचे ग्राम शाखा सचिव, तालुका अध्यक्ष, जिल्हाध्यक्ष तसेच मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष, डॉ. पंजाबराव देशमुख शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष आदी पदांवर त्यांनी काम केले आहे. मराठा सेवा संघाच्या प्रदेश सहसचिवपदी चंद्रशेखर भदाणे यांची निवड झाल्याबद्दल, त्यांचे मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड आदींसह संघाच्या सर्व कक्षांच्या पदाधिकारींनी तसेच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
ज्ञानगंगा घरोघरी
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/ बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577

CMYK

दैनिक

# लक्ष महाराष्ट्र





# नाशिक महानगर परिवहन महामंडळचा वर्धापनदिन विविध उपक्रमांनी साजरा
























नाशिक

। दि. ८ जुलै २०२१ रोजी स्थापन करण्यात आलेल्या नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंकचा द्वितीय वर्धापन दिन शनिवार दि. ८ जुलै रोजी साजरा करण्यात आला. शनिवारी सिटीलिंक वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. प्रवाशांचा सिटीलिंकला मिळणारा उदंड प्रतिसाद लक्षात घेता प्रवासी, चालक, वाहक हे सिटीलिंकचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे प्रवासी, चालक, वाहक यांना पुष्प तसेच पेढे वाटप करण्यात येऊन त्यांना देखील या उपक्रमात सहभागी करून घेण्यात आले. निमाणी बस स्थानक तसेच नाशिकरोड बसस्थानक याठिकाणी हा पेढे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. निमाणी बसस्थानक याठिकाणी वाहतूक नियंत्रक आर.बी.आहेर, एस.एम.चव्हाणके, सी.व्ही.आव्हाड, मार्ग तपासणीस पर्यवेक्षक नाना सानप यांच्या हस्ते पुष्प व पेढे वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. तर नाशिकरोड बसस्थानक याठिकाणी वाहतूक व्यवस्थापक अजित बच्छाव, आर.बी.जैन, ए.ए.आव्हाड, एस.एल.पवार यांच्या हस्ते पेढे वाटप करण्यात आले. तसेच सिटीलिंक मुख्यालयात पास काढण्यासाठी आलेल्या प्रवाशांना पेढे वाटप करण्यात आले. यावेळी प्रवाशांनी सिटीलिंक द्वितीय वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच तपोवन डेपोत श्रीफळ चढवून बसेसची पुजा करण्यात आली. यावेळी पोलिस निरीक्षक गणेश न्याहाळदे, वाहतूक महाव्यस्थापक मिलिंद बंड, व्यवस्थापक रणजित ढाकणे यांचा सत्कार करण्यात येऊन सिटीलिंकच्या यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी व्यवस्थापक रणजित ढाकणे, राजीव शिंदे, महेश भागवत, योगेश बर्वे, अनिल साळुंके, अमोल पाटील आदी उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ

दैनिक
# लक्ष महाराष्ट्र






# पथविक्रेते, भाजीविक्रेत्यांना हटविले, पाच दिवस लक्ष ठेवले जाणार




















नाशिक । महापालिकेच्या पंचवटी विभागात काल सोमवार रोजी अतिक्रमण विभागाने अनधिकृत पथविक्रेत्यांवर, भाजी विक्रेत्यांवर कारवाई केली. निमाणी बस स्थानक ते दिंडोरी रस्ता या वर्दळीच्या मार्गावर कारवाई करुन अनधिकृत विक्रेत्यांना हटविले. त्यामुळे वाहतुकीचा अडसर दुर होऊन रस्ता मोकळा झाला आहे. पुन्हा अनधिकृत पथविक्रेते येऊ नयेत यासाठी सतत पाच दिवस या भागात लक्ष ठेवले जाणार असून कारवाई होणार असल्याचे अतिक्रमण विभागाने सांगितले. आयुक्त तथा प्रशासक भाग्यश्री बानायत यांच्या आदेशाने अतिक्रमण विभाग उपायुक्त करूणा डहाळे यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली. पंचवटी विभागीय अधिकारी योगेश रकटे यांच्या निर्देशानुसार निमाणी दिंडोरी नाका महालक्ष्मी ते रिलायन्स पंप येथे कारवाई करण्यात आली. अतिक्रमण विभागाचे निरीक्षक प्रविण मोरे, टिम प्रमुख उमेश खैरे यांनी दोन टप-या, मोठे लोखंडी बाकडे पाच नग, प्लास्टिक कॅरेट आठ नग, बोर्ड आणि बॅनर बारा नग असे मिळून एक ट्रक साहित्य जप्त केले. जप्त केलेले साहित्य अतिक्रमण विभागाच्या आडगाव येथील गोडाऊनमध्ये जमा करण्यात आले. चार दिवसांपूर्वी ६ जुलै रोजी पंचवटी विभागात आरटीओ ते राहू हॉटेल बोरगड मार्गावर कारवाई करुन अनधिकृत विक्रेत्यांना हटविले होते. यावेळी जाहिरात फलकही जप्त करण्यात आले. दोन गाडी भरुन साहित्य जप्त करण्यात आले होते. त्यानंतर काल निमाणी भागात मोठी कारवाई करण्यात आली. नागरिकांनी स्वत:हून अनधिकृत बांधकामे, पत्र्याचे शेड, टप-या अशा प्रकारचे अतिक्रमण काढून घेण्यात यावे. अन्यथा अतिक्रमण पथकाद्वारे कारवाई करण्यात येईल तसेच रस्त्यावरील विक्रेत्यांवरही कारवाई करण्यात येईल, असा इशारा विभागीय अधिका-यांनी दिला आहे.

संकलन : दिपक वाघ